नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०४/२०२५ (मंगळवार)**

---

## अल्पवयीन पिडीतेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. सावनेर** :— अल्पवयीन फिर्यादीयांच्या रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सावनेर येथे अप क्र. ६८५/२२ कलम ३७६(२) (जे), ३७६(३), ३४, ५०६ भादंवि सहकलम ४,५,६,९,१०,१६,१७ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील अल्पवयीन फिर्यादी हीचे पोटात दुखत असल्याने तिला दवाखान्यान भरती केले असता ती ६ महीन्याची गर्भवती असल्याचे समजले. यातील फिर्यादी पिडीत हीने पोलीस स्टेशन सावनेर येथे रिपोर्ट दिली की, ती अल्पवयीन आहे हे माहीत असतांना सुध्दा यातील आरोपी क्र. १ .साहील भिमराव नेहारे, वय १८ वर्षे, रा पानाउबाळी ता कळमेश्वर जि नागपुर याने पिडीतेसोबत जानेवारी २०२२ आणि फेब्रुवारी २०२२२ मध्ये आरोपी क्र २. वर्षा अमित भोंडवे रा पानाउबाळी ता कळमेश्वर जि. नागपुर हीच्या घरात बोलावुन तिचेवर लैंगिक अत्याचार केला त्यामुळे पिडीता ही गरोदर झाली. आरोपी क्र.२ ही पिडीतेला काहीतरी कारण सांगुन आपल्या घरी बोलवत होती.तिच्या घरी आधीच हजर असलेला आरोपी क्रं १ हा पिडीतेसोबत लैंगिक अत्याचार करत होता. सदर गुन्हयात आरोपी क्र १ याला आरोपी क्र २. व हीने मदत केली होती. तसेच आरोपीतांनी सदर घटनेबाबत कुणालाही सांगीतल्यास पिडीतेला मारण्याची धमकी दिली.

**सदर प्रकरणाचे तपास सहा.पोलीस निरीक्षक श्रीमती सोनाली रासकर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. न्यायालयात दाखल केले होते. सदर प्रकरणात मा.एक्स्ट्रा डी.जे श्री. आर.पी.पांडे यांनी दिनांक २९/०४/२०२५ रोजी वरील नमुद दोन्ही आरोपीस प्रत्येकी कलम ६ पोक्सो मध्ये २० वर्षे सश्रम कारावास व १०,०००/—रू दंड,दंड न भरल्यास ०१**

**वर्षे सश्रम कारावास , कलम ५०६ भादवि मध्ये ०१ वर्षे सश्रम कारावास व २,०००/रू दंड,दंड न भरल्यास ०२ महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती सोनाली राऊत यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोहवा मधुकर अदमने ब.नं ३७६ पो.स्टे.सावनेर यांनी मदत केली आहे.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ५० लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त अरोली पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन अरोली** :— दिनांक २८/०४/२०२५ रोजी आरोली पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस पेट्रोलींग करीत असतांना धर्मापुरी कडुन एक निळ्या रंगाचा १२ चक्का टिप्पर येतांना दिसला त्याचे चालकाला सदर टिप्पर थांबविण्यासाठी इशारा करून वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता सदर टाटा कंपनीचा टिप्पर विना क्रमांकाचा होता. वाहनाची पाहणी केली असता त्यात रेती भरून होती. वाहन चालकाला त्यांचे नाव व गाव विचारले असता चालकाने त्याचे नाव **अंकुर अरविंद बन्सोड वय २६ वर्ष रा. टेकेपार पुर्नवसन ता. जि. भंडारा. असे असल्याचे सांगितले.** सदर वाहन चालकाला रेती वाहतुक परवाना बाबत विचारपुस केली असता त्याचेकडे रेती वाहतुक परवाना नसल्याचे सांगितले. सदर चालक टिप्परमध्ये टिप्पर **मालक सुभम रमेश ठवकर वय ३२ वर्शे रा. खात रोड भंडारा** याचे सांगणेवरून टिप्परमध्ये रेती भरून नेत असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली.पोलीसांनी पंचासमक्ष **१) १२ चक्का टाटा कंपनीचा बिना क्रमांकाचा टीप्पर किंमती ५०,००,००० /— रूपये, २) १० ब्रास रेती किंमती ५०,००० /— रूपये ३)एक अन्ड्राईड मोबाईल किंमती १०,०००/— रूपये असा एकुण ५०,६०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**सदर प्रकरणी नमुद आरोपी वाहन चालक आणि वाहन मालक यांच्या आरोपीतांविरूध्द पोस्टे अरोली येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) म.ज म सहीता सहकलम ४.२१. खान खनिज अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान**

**प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चालक आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद खापा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक २८/०४/२०२५ रोजी खापा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्र १:—** पोलीस गोसेवाडी शिवारातील जुने शासकीय रेती डेपो कडे जात असतांना ०१:१० वाजता **महींद्रा ५७५ डी आय ट्रॅक्टर क्रं एम.एच ४० एल ३२४७ हे रेती डेपो कडुन येताना दिसले. पोलीसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्याबाबत इशारा केला असता वाहन चालक त्याच्या ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉली जागीच सोडुन अंधाराचा फायदा घेवुन पळुन गेला.** पोलीसांनी पंचासमक्ष **१) १ ब्रास रेती आणि २) महींद्रा ५७५ डी आय ट्रॅक्टर क्रं एम.एच ४० एल ३२४७ त्याला जाडुन असलेली ट्रॉली क्रं एम.एच ३१ डब्ल्यु ८७४१ ३) इतर साहीत्य असा एकुण ८,०३,५००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**कारवाई क्र २:—** पोलीस गोसेवाडी शिवारातील जुने शासकीय रेती डेपोचे ठिकाणी गेले असता ०१:३० दोन इसम घमेले, फावडे च्या सहायाने सदर ठिकाणी असलेल्या **ट्रॅक्टर मध्ये रेती भरतांना दिसुन आले. पोलीसांना पाहुन दोन्ही इसम अंधराचा फायदा घेत तेथुन पळुन गेले.** पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष **१) १/२ ब्रास रेती आणि २) जॉन डिअर कंपनीचा हिरव्या रंगाचा ट्रॅक्टर क्रं एम.एच ४० सी क्यु ०१५४ त्याला जाडुन असलेली ट्रॉली क्रं एम.एच ४० सी एच ६४९६ ३) इतर साहीत्य असा एकुण ७,०२,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**दोन्ही कारवाईमध्ये पोलसांनी २ वाहनासह , रेती आणि साहीत्य असा एकुण १५,०५,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**सदर प्रकरणी नमुद आरोपी वाहन चालक आणि वाहन मालक यांच्या आरोपीतांविरूध्द पोस्टे खापा येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) म.ज म सहीता सहकलम ४.२१. खान खनिज अधिनियम सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये २ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई ०५ जनावरांची सुटका,रामटेक पोलसांची कारवाई

**पोलीस स्टेशन रामटेक** :—दिनांक २८/०४/२०२५ रोजी रामटेक पोलीस ,पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली , अवैधरित्या कत्तलीकरीता जनावरांची वाहतुक केली जात आहे. त्यानुसार पोलसांनी पेट्रोलींग केली असता पाण्याच्या टाकी जवळ, चाचेर येथे टाटा एस मालवाहु गाडी क्र. एम.एच ४०. ५७८० मिळुन आली. पोलीसांनी वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यात ५ गोवंश जनावरे ( १ गाय व ४ गोऱ्हे ) मिळुन आले. सदर जनावारांना चारापाण्याची कोणतीही सोय न करता, शिंगाला व पायाला दोरखंडाने बांधुन जनावारांची वाहतुक केली जात होती. वाहन चालक कृष्णा श्रीराम दोभेकर वय ४० वर्ष रा. नगरधन रामटेक आणि २. जनावर मालक योगेश लक्ष्मण वाडीभस्मे वय ४० वर्ष रा.निमखेडा ( गोपाळ पाटलांचा ) ता. पारशिवनी हे मिळुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक** टाटा एस मालवाहक गाडी क्र. एम. एच ४०.५७८० किंमती २,००,०००/— रूपये **आणि ५ गोवंश जनावरे(** १ गाय व ४ गोऱ्हे **) २२,०००/— रूपये असा एकुण किंमती २,२२,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे. मिळुन आलेल्या जनावरांच्या देखभाली करीता त्यांना दयोदय गौशाळा, कवडक ,रामटेक जि. नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे.**

**नमुद दोन्ही आरोपीतांविरूध्द कलम ११(१) (ड) ,५ प्रा.छ. अधि. सहकलम ५ (ए),५ (बी) महा. पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.नमुद दोन्ही आरोपीतांना पोलीसांनी अटक केली आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने